**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतूदींचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांना दंड (Spot Fine) करण्याचे अधिकार महानगरपालिकांना प्रदान करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकःस्वमअ-२०१७/प्र.क्र.२५६/नवि-३४**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: ३० डिसेंबर, २०१७

**वाचा :** (१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ २०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे, २०१५
(२) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाची दिनांक ८ एप्रिल, २०१६ ची अधिसूचना

**शासन निर्णय-**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी सुरु आहे. या अभियानांतर्गत शहरांमधील ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा नाही अशा कुटुंबियांना शौचालयाची सुविधा (वैयक्तीक अथवा सामुदायीक) उपलब्ध करुन देवून शहरे "हागणदारी मुक्त" करणे, तसेच शहरातील घनकचरा व्यवस्थापन करुन शहर "स्वच्छ" करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी राज्यातील प्रत्येक शहरामध्ये सुरु आहे. या अभियानांतर्गत ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही अशा कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देवून **राज्याचा संपूर्ण नागरी भाग हा दिनांक १ ऑक्टोबर,२०१७ रोजी मा.राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमामध्ये हागणदारी मुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे.**

३. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार निर्मितीच्या जागी कचऱा विलगीकरण करण्याची जबाबदारी ही संबधित कचरा निर्माण कर्त्यांची आहे. तसेच, मोठया प्रमाणात कचरा निर्माण (Bulk Waste Generator) (दर दिवशी १०० किलो अथवा त्यापेक्षा अधिक) करणाऱ्यांची, निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचीही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे.

४. त्यानुसार, घन कचरा व्यवस्थापनांतर्गत दिनांक १ मे,२०१७ पासून राज्यातील प्रत्येक शहरामध्ये **"कचरा लाख मोलाचा"** या अंतर्गत निर्मितीच्या जागी कचऱ्याचे विलगीकरण ( ओला व सुका) करुन या विलगीकृत केलेल्या कचऱ्यावर केंद्रित अथवा विकेंद्रित पध्दतीने प्रक्रिया करण्याबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना सूचना देण्यात आल्या असून, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

५. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या अनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था शहरामधील नागरिकांना सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा प्रकारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सेवा देत असताना नागरिकांकडूनही त्यास सहकार्य मिळणे अपेक्षित आहे. परंतु, जे नागरीक सहकार्य करीत नाहीत त्यांना घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील तरतूदीनुसार दंड करणे आवश्यक आहे.

६. वरील परिच्छेदामध्ये केलेले विवेचन लक्षात घेता, घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतूदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार महानगरपालिकांना देण्यासाठी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५० (अ) मधील तरतूदी नुसार शासनाने पुढील प्रमाणे निदेश का देण्यात येवू नयेत याबाबतचे लेखी अभिवेदन या आदेशाच्या दिनांका पासून पंधरा दिवासात शासनाकडे करावे.

*“घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतूदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती / संस्थांना या शासन निर्णया सोबतच्या **जोडपत्र -१** मध्ये नमूद केल्यानुसार दंड करण्यासाठीचे दर शासन निश्चित करून देत असून, या बांबींसाठी दंड वसूल करण्याचे अधिकार सर्व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येत आहेत. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.”*

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२३०१५११०६४३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sudhaker
Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2017.12.30 17:06:42 +05'30'

**( सुधाकर ज्ञा. बोबडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री (नगर विकास), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त, महसूल विभाग, (सर्व)
६. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, वरळी, मुंबई

७. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
८. जिल्हाधिकारी (सर्व)
९. मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत (सर्व)
१०. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) मुंबई
११. मा.प्रधान सचिव (नवि-२), यांचे स्वीय सहाय्यक
१२. निवड नस्ती (नवि-३४).

**जोडपत्र -१**

**(दंडाचे जोडपत्र)**

| अ.क्र. | कृती /बाब | महानगरपालिका | |
|---|---|---|---|
| | | "अ" व "ब" वर्ग रूपये | "क" व "ड" वर्ग रूपये |
| १ | रस्ते/मार्गावर घाण करणे | १८० | १५० |
| २ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | १५० | १०० |
| ३ | उघडयावर लघवी/लघुशंका करणे | २०० | १०० |
| ४ | उघडयावर शौच करणे | ५०० | ५०० |

**व्याख्या**

(१) **"घाण"** म्हणजे ज्यापासून उपद्रव होऊ शकेल असे टाकाऊ पदार्थ, धूळ, अस्वच्छ परिस्थिती तसेच या नियमान्वये प्रतिबंधित करूनही सार्वजनिक सुव्यवस्था, पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता, जीवन व स्वास्थ्य यास बाधा येईल अशी अस्वच्छता होय.

(२) **"घाण करणे"** म्हणजे सार्वजनिक अथवा खाजगी ठिकाणी निष्काळजीपणाने टाकलेली, फेकलेली, पसरवलेली अथवा सुटलेली घाण किंवा सार्वजनिक अथवा खाजगी ठिकाणी घाण टाकणारी, फेकणारी, पसरवणारी कृती होय.

(३) या शासन निर्णयामध्ये वापरलेले शब्द व वाक्प्रचार, ज्यांची या यामध्ये व्याख्या केलेली नाही, त्यांचा अर्थ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६, पाणी (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ आणि सर्व कचरा व्यवस्थापन नियम यापैकी संबंधित अधिनियम/नियमामध्ये नियुक्त केल्यानुसार राहील.

********